तक्रार युएलपी क्र.१५/२०२३
निशाणी क्रं. यू—७

## जाबदारातर्फे ॲड. श्री.महाडेश्वर यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु

माझे १२ वी पर्यंत शिक्षण झाले असून लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी औद्योगिक न्यायालय व मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, जाबदार यांच्याकडून विक्री आणि तत्सम व्यवसाय करून नफा मिळवण्याचे काम केले जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार हे व्यवसाय करून नफा मिळवतात याबाबतचा पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार उद्योग या स्वरूपाची कोणतीही कामे करत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांचे अधिका—यांसोबत माझे संबंध कधीही ताणतणावाचे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांचे अधिकारी यांचे माझेविरूध्द पुर्वग्रहदुषीत आणि वितुष्ट स्वरूपाची वागणूक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की,जाबदार यांनी मला रक्कम रू. १,९७,७४५/— अदा केली आहे. साक्षीदार स्वत: सांगतो की मी स्वत: स्वीकारली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझेसह इतर कर्मचा—याची अधिसंख्य पद निर्माण करणारा शासननिर्णय दिनांक १०/०५/२०१८ रोजी झाला. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या शासन निर्णयामध्ये अनावधानाने माझी जन्मतारीख २१/०५/१९५७ अशी नमूद करण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, शासन निर्णयानंतर जन्मतारखेबाबत मी दिड वर्षांनंतर जाबदार यांच्याकडे गेलो. हे म्हणणे खरे आहे की, दिड वर्षांनंतर मी सादर केलेलया कागदपत्रांवरून जाबदार यांनी माझे जन्मतारखेबाबत शासन स्तरावर पत्रव्यवहार केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांनी माझे सुधारीत जन्मतारखेनुसार नियुक्ती देण्यात यावी अशी विनंती जाबदार यांनी शासन स्तरावर केली होती. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांनी माझे जन्मतारखेनुसार अधिकसंख्य पद निर्माण करून नियुक्ती द्यावी म्हणून शासनाकडे पत्रव्यवहार केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०/०५/२०१८ रोजी माझी जन्मतारीख चुकीची नोंद केल्यामुळे दिनांक १०/०५/२०१८ रोजी मी वयाची ६० वर्षे पुर्ण केली असल्यामुळे अधिसंख्य पदावर मला नियुक्ती देता आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांची जन्मतारखेबाबतची कृती अनावधानाने केली असून मुद्दामहून

केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांनी जन्मतारखेच्या दुरूस्तीबाबत आवश्यक तो पत्रव्यवहार केला होता. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांनी दिनांक २३/१२/२०१९ रोजी अवर सचित वन विभाग यांना पत्र लिहून माझे जन्मतारखेमध्ये दुरूस्ती सुचवून माझी अधिसंख्य पदावर नियुक्ती करावी अशी शिफारस केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २३/१२/२०१९ रोजीचे पत्र माझे विनंती नुसार हस्त देय दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे पत्र माझेकडून अवर सचिव वन विभाग यांना देणे अपेक्षीत होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २३/१२/२०१९ रोजीचे पत्र अवर सचिव वन व महसूल विभाग यांना पाहोचल्याची पोहोच मी जाबदार यांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वनपरीक्षेत्र, कोल्हापूर यांनी दिनांक ०४/१२/२०२० रोजी माझी कागदपत्रे पुन्हा शासनाकडे पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, शासन निर्णय येण्यापुर्वीच मी प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार यांनी माझे विरूध्द अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या धारणेमधून तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०१४ ते २०१८ आणि त्यानंतर जाबदार यांच्याकडे कधीही कामाला नव्हातो. हे म्हणणे खरे नाही की, जाबदार यांनी मला कधीही तोंडी आदेशाने कामावरून कमी कले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदार यांच्यावर चुकीचे आरोप करून चुकीची तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

( के. बी. कामगौडा )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.

कोल्हापूर.
दिनांकः— ०२/०५/२०२५